National Journal of Multidisciplinary Research and Development
ISSN: 2455-9040; Impact Factor: RJIF 5.22
www.nationaljournals.com
Volume 1; Issue 5; November 2016; Page No. 18-19

# लोकशाहीत निवडणुक आयोगाचे महत्व

डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव
प्रा. पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख देगलूर महाविद्यालय, देगलूर

**प्रस्तावना**

२०१४ च्या लोकसभा निवडणुकानंतर या देशात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाचे स्पष्ट बहुमतातील शासन स्थापन झाले. या शास-नाला २४ वर्षानंतर भारतीय जनतेने स्पष्ट बहुमत दिले ही बाब सशक्त भारतीय लोकशाहीचे प्रतीक आहे. या लोकशाहीची धुरा निवडणुकांच्या माध्यमातून आपल्या खांद्यावर व्यवस्थित सांभाळण्याचे काम करणारी एक घटनात्मक स्वायत्त संस्था आहे, ती म्हणजे निवडणुक आयोग आहे. या निवडणुक आयोगाने मागील सात दशकापासून भारतासारख्या विशाल लोकसंख्या व खंडप्राय देशातील सर्व निवडणुका यशस्विरित्या पार पाडण्यात महत्वाची भुमिका बजावली. भारतीय राज्यघटनेतील कलम ३२४ ते ३२७ मध्ये निवडणुक आयोगाची रचना, कार्यप्रणाली व अधिकाराची तरतूद करण्यात आली. या कलमांनीच निवडणुक आयोग बहुसदस्यीय असावे हे निश्चित केले. मध्यंतरी ते एकसदस्यीय होते. या निवडजुक आयोगाचे मुख्य आयुक्त, इतर आयुक्त यांची नियुक्ती, बडतर्फी, वेतन व स्वायतत्ता हे ठरवण्याचा हक्क भारतीय संसदेला आहे. भारतीय लोकशाहीला नियंत्रीत ठेवणाऱ्या अनेक घटकांपैकी निवडणुक आयोग हा एक घटक आहे.

१९९४ च्या पुर्वी विशेषतः ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीपूर्वी आणि मुख्य निवडणुक आयुक्त टि.एन.शेषन यांच्यापूर्वी या देशातील निवडणुक यंत्रणा हाताळणारी निवडणुक आयोगासारखी एक स्वतंत्र व स्वायतत्ता यंत्रणा असते हे फार लोकांना माहित नसावे. टी.एन.शेषणने या देशातील प्रत्येक मतदाराला Voter ID देण्याचा घेतलेला निर्णय, ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीनूसार प्रत्येक राज्यात स्थापन झालेले राज्य निवडणुक आयोगाने जनतेला निवडणुक आयोगाची स्वतंत्र ओळख व अस्तित्व जाणवुन दिले.

प्रस्तुत लेखात निवडणुक आयोगाचे कार्य, महत्त्व, समस्या, उणीवा, निवडणुक आयोगाच्या कार्यप्रणालीत सुधारणा करण्यासाठी आजपर्यंत सुचवित आलेल्या सुधारणा आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे इलेक्ट्रॉनिक मतदान मशीनच्या संदर्भात निर्माज झालेले वादंग या बाबतची चर्चा करण्यात आली.

निवडणुक आयोग अगदी सक्षमपणे आपले सर्व कार्य पार पाडत असते. संसद, राज्य विधीमंडळाच्या निवडणुका, प्रत्येक जनगणनेनंतर नविन मतदार याद्या तयार करणे. प्रत्येक मतदाराला निवडणुक ओळख पत्र देणे, निवडणुक व्यवस्थे संदर्भातील वादविवाद, प्रश्नांची सोडवणुक करणे, त्यासाठी स्वतंत्र अधिकारी वर्गाची नेमणुक करणे, राजकीय पक्षामार्फत निवडणुकीच्या दरम्यान प्रचार कसा करावा यासाठीची आदर्श आचारसंहिता प्रकाशित करणे, त्याचे पालन होते का नाही ते पाहणे, मतदार संघांची निश्चिती व पुनर्रचना करणे, निपक्ष व स्वतंत्ररित्या निवडणुका घ्याव्यात यासाठी निवडणुक यंत्रणा तयार करुन तीचे परिक्षण करणे, निवडणुक कार्यक्रम व तारखा जाहिर करणे, उमेदवाराकडून उमेदवारी अर्ज दाखल करुन घेणे, त्याची छानणी करणे व निवडणुका सुरळीत पार पडाव्यात यासाठी लागणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची निवड करणे, निरीक्षकांचीही निवड करणे, याबाबतची विनंती राष्ट्रपती व राज्यपालांना करणे, एखाद्या मतदान केंद्रावर गोंधळ झाल्यास मतदान रद्द करणे, राजकीय पक्षांना मान्यता देणे, राजकीय पक्षांना निवडणुक चिन्हांचे वाटप करणे, लोकसभा व राज्यविधानसभा निवडणुकातील उमेदवारासाठी खर्च मर्यादा निश्चित करणे इ. कार्य करावे लागते. मागील बऱ्याच काळापासून निवडणुक प्रणालीत सुधारणा करण्याच्या हेतूने आंदोलन चालवण्यात आले. जे आजही चालू आहे. ज्याचे सकारात्मक परिणाम दिसत आहेत. ज्यात न्यायालयाने वारंवार आपले मत मांडले. न्यायालयाच्या निर्णयाने निवडणुक प्रणाली आणि निवडणुक आयोग दोघांस नवीन दिशा मिळाली. यामुळे निवडणुक प्रणालीतील अनेक असंवैधानिक व लोकशाही विरोधी तत्व दूर झाले. निवडणुक आयोगाचे कठोर प्रशासन, न्यायालयाचे महत्वपूर्ण निर्णय, माहिती अधिकार, लोक जागरुकता, माहिती तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर, ई.व्ही.एम. मशीनचा वापर या सर्वांमुळे निवडणूक घेण्याच्या प्रक्रियेत सकारात्मक बदल झाला.

भारतात निवडणुक आयोगाने चांगले काम करावे यासाठी एक स्वतंत्र निवडणुक आयुक्त व त्यांच्या मदतीसाठी इतर निवडणुक आयुक्ताची रचना करण्यात आली. परंतु या मुख्य निवडणुक आयुक्ताच्या निवडीच्या पात्रता बाबत राज्यघटना मौन बाळगते. याबाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार संसदेचा आहे. संसदेने नियम बनवल्यानंतरच ते राष्ट्रपतिकडे जातात. मुख्य निवडणुक आयुक्ताचा दर्जा सर्वथा सर्वोच्च न्यायालया सारखा नाही. त्याच्या कार्यकाळही सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशासमान नाही. निवडणुक आयोगास आपल्या सचिवालयात लागणारे कर्मचारी भरती करण्याचा अधिकार नाही. यामुळे निवडणुक आयोगास स्वतःचे घटनात्मक कार्य करण्यासाठी शासनावर अवलंबून राहावे लागते. परिणामतः या आयोगास आपल्या कर्मचाऱ्यावर नियंत्रण ठेवता येत नाही. जे कुशल आणि निपक्ष प्रशासनासाठी योग्य नाही या कर्मचाऱ्यांनी एखादी चुक केली असता त्यांच्यावर कार्यवाही करण्याचा अधिकार निवडणुक आयोगास नाही.

भारतात निवडणुक प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी कांही कायदे बनवण्यात आले. ज्यात १९५० चा व १९५१ चा लोकप्रतिनिधी ज्ञायदा महत्वाचा व प्रचलित आहे. या कायद्यातही बरेच दोष आहेत. भारतीय निवडणुक पध्दतीत निवडुन आलेला प्रतिनिधी त्याच्या क्षेत्रातील जनतेच्या बहुमताचे प्रतिनिधित्व करत नाही. यानुसार निवडुन आलेला प्रतिनिधी बहुमताऐवजी अल्पमताचे प्रतिनिधित्व करतो. भारतात निवडणुकीसंबंधी अनेक कायदे बनवण्यात आले. तरी निवडणुकीसाठी निर्धारित करण्यात आलेला खर्चाच्या मर्यादेचे महत्व कागदावरच आहे. खासदार गोपीनाथ मुंडेंनी एका कार्यक्रमात जाहीर सांगितले की, ८ करोड रुपये खर्च करुनच मी संसेदत निवडुन येतो. भारतासारख्या गरीब देशात लोकांच्या राजकीय सहभागीत्वाबाबत बरेच प्रश्नचिन्ह आहेत. या निवडणुकीत परकीय धन, काळापैसा, उद्योगपती आणि भांडवलदारांचा पैसा अधिक महत्वाची भुमिका बजावतो. याचे उत्तम उदाहरण २०१४ ची लोकसभा निवडणुक. निवडणुकीत सहभागी होणारा प्रत्येक उमेदवार, नेता, राजकीय पक्ष पैशाचा वापर करतात. वर्तमानपत्रातून त्याबाबतच्या बातम्या प्रसिध्द होतात. खुलेआम पैसा, दारुसह इतर वस्तूंची देवाण-घेवाण मतदानाच्या बदल्यात निवडणुकीत होते. या सर्वांची खबर निवडणुक आयोगास असते तरी निवडणुक आयोग हतबल होवून हे सर्व पाहत असते.

भारताच्या निवडणुक यंत्रणेला भ्रष्ट करुन तिचे स्वरुप नोटशाहीत रुपांतरीत ज्ञरण्यात अनेक घटकासोबत सत्तारुढ पक्षाची भूमिका महत्वाची असते. या सत्तारुढ पक्षाने शासकीय साधनांचा चुकीचा वापर करून निवडणुक प्रणालीचे स्वरुप बिघडवले. भारतीय शासन व्यवस्थेत लोकसभा व राज्यातील विधानसभांचे विसर्जन केल्यानंतरही नवीन शासन स्थापन होईपर्यंत जुनेच मंत्रीमंडळ शासनाधिन असते. यामुळे ते निवडणुकीच्या काळात शासकीय प्रशासन, यंत्रणा व साधन सामुग्री आणि शासकीय निधीतून खर्च करण्याच्या अधिकाराचा दुरुपयोग करते. निवडणुकीपूर्वी व निवडणुकादरम्यानच्या प्रचारात राजकीय पक्ष मोठे-मोठे आश्वासन देतात. भारताच्या निवडणुक यंत्रणेला विचलित करण्यात अनेक घटक कार्यरत असतात. प्रसार माध्यमांची भूमिज्ञा

यात महत्वाची असते. सांप्रदायिकता, जातियता, प्रदेशवाद, भाषावाद, पैसा या सर्वांची भुमिका महत्वाची असते. राजकीय पक्ष निवडणुकीत उमेदवारी देताना मतदार संघात कोणत्या जातीचे मतदार अधिज आहेत हे पाहून त्याच जातीच्या उमेदवारास तिकीट देतात. तसेच उमेदवाराला निवडून येण्यासाठी नको त्या मार्गाचा अवलंब करावा लागतो. अच्छे दिन आएंगे, कुठे नेवून ठेवलाय महाराष्ट्र सर्वांच्या बँक खात्यात १५ लाख रुपये येतील, काळापैसा वापस आणू, भ्रष्टाचारमुक्त भारत, लोकपाल ईत्यादी आश्वासने दिली जातात. गुंडगिरी, दडपशाहीचा वापर करून निवडणुका जिंकल्या जातात. गोळीबार करुन, बुथ ताब्यात घेवून, लोकांना धमकावून मतदान मिळवले जाते. महाराष्ट्रीयन माणसाच्या नावावर व पारदर्शकतेचा आधार घेवून निवडणुका लढवून सत्ता मिळवली जाते. या सर्वप्रकारात बदल व्हावा म्हणून कांही आयोज व समित्यांचे गठण करण्यात आले. ज्यात तारकुंडे समिती, टी.एन.शेषण शिफारशी, दिनेश गोस्वामी समिती, वी.पी.जीवन रेड्डी समिती, इंद्रजीत समिती याशिवाय अनेक कायदे व समित्या शासनाने नेमल्या. या समित्यांनी वयोमर्यादा १८ वर्ष केली. खर्चाचा हिशोब राजकीय पक्ष व उमेदवारांनी द्यावा, पुनरमतदान पध्दती, आरक्षणासाठी चक्रानुक्रम पध्दती, मतदारांस ओळखपत्र देणे, इत्यादी. महत्वपूर्ण शिफारशी सुचवल्या ज्यास भारतीय संसदेने स्विकृती देवून निवडणूक प्रणालीत तिची अंमलबजावणी केली.

भारतीय निवडणुक पध्दतीत सुधारणा व्हाव्या म्हणून वारंवार न्यायालय कांही निर्णय देते किंवा विविध खटल्यात आपले मत मांडते ज्याचा संबंध निवडणुक सुधारणांशी आहे. निवडणुकीत भाग घेणाऱ्या उमेदवाराबाबत माहिती जाणून घेण्याचा मतदारांचा मुलभुत अधिकार असल्याचा निर्णय २००२ साली दिला. यामुळे उमेदवारास निवडणुकीचा अर्ज भरताना संपत्ती, शैक्षणिक योग्यता, गुन्हेगारीचे रेकॉर्ड इत्यादीचा उल्लेख करणे अनिवार्य बनले. परंतू शासनाने लोक प्रतिनिधीत्वाच्या कलम ३३ बी पास करुन न्यायालयाच्या उपरोक्त दुरुस्ती व सुचनेस कमकुवत बनवले. सर्वोच्च न्यायालयाने यावर टिका करताना हे संशोधन मतदानाच्या अधिकारात दखल असल्याचे सांगुन त्यास नाकारले. शेवटी निवडणुक आयोगाने निवड प्रक्रियेला स्वच्छ करण्याच्या उद्देशाने उमेदवारास खालील माहिती उमेदवार अर्जात उल्लेखित करण्याचे अनिवार्य केले. यामध्ये उमेदवाराने स्वतःविषयीच्या गुन्हेगारी पार्श्वभुमीवर संबंधीत असलेला तपशीलाची विस्तृत माहिती द्यावी. उमेदवार, त्यांचा नवरा व पत्नी किंवा इतर आश्रित व्यक्तींची संपत्ती व बँक बॅलेन्सची माहिती द्यावी. उमेदवारांची शैक्षणिक पात्रता नमुद करावी. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभुमीवर नियंत्रण लागले. तसेच निवडणुकीत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियंत्रण बसले. कारण या निर्णयानुसार माहिती लपवण्याच्या आधारावर सर्व तपासणी करुन निवडणुक आयोग निर्णय घेते.

निवडणुक आयोज व पध्दतीत वाढता गैरकारभार अस्ताव्यस्तता व वाढती जबाबदारी लक्षात घेवून त्यात सुधारणा करण्यासाठी अनेक नवीन प्रयत्न होत आहेत. ज्यात ज्या उमेदवारांवर न्यायालयीन प्रक्रियेतून गुन्हा सिध्द झाला, पाच वर्षापेक्षा अधिक शिक्षा भोगली व ज्या प्रकरणात न्यायालयाने गुन्हा सिध्द केला अशांना निवडणुक लढण्याची परवानगी नसावी सर्व मतदारांना निवडणुकीच्या वेळेस आपले ओळख पत्र किंवा इतर कांही ओळखीची कागदपत्रे दाखल करणे आवश्यक केले. ज्यावरुन योग्य मतदारांची ओळख होते. जे गंभीर गुन्हेगार आहेत. त्यांना निवडणुकीपासून दूर ठेवणे, उमेदवारांच्या सुरक्षा निधीत वाढ करणे, उमेदवारांचे दोन जागेवरुन निवडणुक लढण्यास बंदी करणे, निवडणुक लढवताना जाहिरातींवर प्रतिबंध लादणे इत्यादींचा समावेश आहे. तसेच ओपीनियन पोल आणि निवडणुकीतील सर्वेक्षणाच्या प्रसार व प्रकाशनावर ज ांही प्रमाणात मर्यादा लादणे.

भारतात निवडणुक आयोग मागील ७ दशकापासून कार्य करत आहे. या ज ाळात निवडणुक आयोगाने आपले महत्व व उपयुक्तता नेहमी सिध्द केली. निवडणुक आयोगाने ७ दशकात भारतीय लोकशाहीला जिवंत ठेवण्यात महत्वाची भुमिका बजावली. भारताचा नागरिक म्हणून मतदारांना एक स्वतंत्र ओळख दिली. मतदान या मतदारांच्या राजकीय हक्काची जाणीव मतदारांना करुन दिली. भारत हा निवडणुकांचा देश आहे असे विश्लेषण केले जाते. कारण या देशात दररोज कोठे ना कोठे कोणत्यातरी निवडणुका होतात. त्यामुळे निवडणुक आयोगाची वाढती व्यस्तता त्यास त्याच्या कार्यात पारदर्शकता व जबाबदार बनवते. या सततच्या निवडणुकातून विशेषतः राष्ट्रीय, राज्यीय व स्थानीक देशास सुटका मिळावी म्हणून सध्याचे शासन एक देश एक निवडणुका हे विधेयक संसदेत मांडण्याच्या विचारात आहे. निवडणुक आयोगाशिवाय भारतीय लोकशाहीचा इतिहास अपूर्ण आहे. निवडणुक आयोग लोकशहीचा अविभाज्य भाग आहे. ती एक लोकशाहीची पूर्वअट आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेचा यशोशिखर सर करण्यासाठी निवडणुक आयोगाची प्राथमिकता महत्वपूर्ण आहे. कारण भारतासारख्या विशाल भूभाग व विशाल लोकसंख्येच्या देशात निवडणुक आयोग निवडणुका घेते. कधी-कधी या निवडणुक आयोगास संसद, राज्य विधीमंडळाच्या निवडणुका एकत्र घ्याव्या लागतात. ज्याची निश्चितता सांगता येत नाही. कारण भारतीय राजकारणातील वाढती राजकीय अस्थिरतेने निवडणुक आयोगाच्या डोक्यावरील कार्यभार वाढवला. या कार्यभाराच्या ओझ्याजाली न दबता आणि राजकीय व्यवस्थेच्या दडपणास बळी न पडता निवडणुक आयोगाने स्वतःची एक स्वतंत्र ओळख जपली. ज्यातून भारतीय निवडणुक आयोग व लोकशाहीतील आंतरसंबंध स्पष्ट झाला. जगातील अनेक देशाचा विचार करता एवढ्या विशाल प्रमाणात निवडणुका घेणारे दुसरे कोणतेच आयोग नसेल. या आयोगाची भुमिका निश्चितच शाश्वत लोकशाही, जनसहभागी लोकशाही उदारमतवादी लोकशाही विकसित करून एक उत्तम व चांगली राजकीय व्यवस्था निर्माण करण्याची राहिली आहे.

संदर्भ ग्रंथ


1. भारतीय संविधान, राजकारण आणि कायदा-सौ.स्मिता जोशी-पिअर्सन.
2. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण-डॉ.भा.ल.भोळे, पिंपळापूरे पब्लिशर्स अँड कंपनी, नागपूर.
3. भारतीय शासन एवं राजनीति-डॉ.बी.एल.फाडिया.
4. लोकशाहीचे बदलते स्वरुप आणि निवडणुकांचे राजकारण-डॉ.अलका देशमुख, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
5. निवडणुक जिंज ण्यासाठी सर्व काही-डॉ.दिलीप सरवटे, डॉ.उदय निरगुडकर, राजहंस प्रकाशन, पुणे.
6. **The Indian Journal of political science Oct-Dec-२०१४. Editor C.P.Barthwal.**
7. **Reinventing politics in India, Editor C.P.Barthwal, S.K.Sharma, Rahul Publishing House, Meerut-२०१५.**